# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No.MISC-(2007/ (322/07) UNI-4
Jnder Sub Section (2) of Section-3 of the Maharashtra University Act 1994 (Mah.XXXV of 1994)

## NATIONAL SERVICE SCHEME

**Dr. I. S. Mohurley** ☎9421719303, 7774027661
**Programme Coordinator** E-mail: ishwarmohurley@gmail.com


No.GU/NSS/34/2015 Date: 15/04/2015

स्मरणपत्र— २

प्रति,

मा. प्राचार्य,
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीशी संलग्नित
सर्व रासेयो महाविद्यालये.

**विषयः— सत्र २०१४—२०१५ मधील रासेयो नियमित व विशेष शिबीर कार्यक्रम अंकेक्षण विवरणे व प्रलेखे सादर करणेबाबत.**

संदर्भः— १) रासेयो कार्यालयाचे पत्र क्र GU/NSS/26/2015 दि. 9/3/2015
२) रासेयो कार्यालयाचे पत्र क्र GU/NSS/32/2015 दि. 7/4/2015

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकीत विषयानुषंगाने आपणांस कळविण्यात येत आहे की, सत्र २०१४—२०१५ मधील अंकेक्षण विवरणे व प्रलेखे दि. १० एप्रिल २०१५ पर्यंत सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु अद्यापपावेतो काही महाविद्यालयानी अंकेक्षण विवरणे व प्रलेखे विद्यापीठाच्या रासेयो कक्षाकडे सादर केलेले नाही.

सत्र २०१२—२०१३ व २०१३—२०१४ मधील रासेयोचे संपूर्ण अनुदान विद्यापीठास प्राप्त झाले असुन वितरणाची प्रक्रिया सुरु आहे. तसेच सत्र २०१४—२०१५ मधील अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीच्या स्वयंसेवक संख्येच्या ९० टक्के अनुदान प्राप्त झाले आहे व अन्य प्रवर्गांच्या स्वयंसेवकांचे अनुदान लवकरच प्राप्त होणार असल्याची सुचना मा. राज्य संपर्क अधिकारी यांचेकडुन मिळाली आहे.

कृपया आपल्या महाविद्यालयाचे रासेयो अंकेक्षण विवरणे व प्रलेखे १०० टक्के खर्चानुसार विहीत नमुन्यात तातडीने दि. २० एप्रिल २०१५ पर्यंत सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे. **ज्या महाविद्यालयांनी रासेयो कार्यक्रम आयोजनावर कोणत्याही प्रकारचा खर्च केला नसेल अशा महाविद्यालयांनी अंकेक्षण विवरणे व प्रलेखे 'निरंक' असल्याचे प्रपत्रे देणे अनिवार्य आहे. विहीत मुदतीच्या आत अंकेक्षण विवरणे व प्रलेखे सादर न केल्यास रासेयो अनुदानाची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची कृपया नोंद घ्यावी तसेच** आपल्या महाविद्यालयाला मिळणारे रासेयो अनुदान स्थगीत करण्यात येईल आणि रासेयो पथक सुद्धा स्थगीत करण्यात येईल याचीही संपूर्ण जबाबदारी आपली राहील. करीता तातडीने सत्र २०१४—२०१५ चे अंकेक्षण विवरणे व प्रलेखे रासेयो कार्यालयास अविलंब सादर करावे. ही विनंती.

धन्यवाद!

डॉ. ईश्वर श्रा. मोहर्ले
कार्यक्रम समन्वयक
कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रत माहीतीस्तवः १) मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.
२) मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.


MIDC Road, Complex, Gadchiroli-442 605 (MS)
Fax: 07132-223322 e-mail: director.studentwelfaregug@gmail.com, Web: gondwana.digitaluniversity.ac / unigug.org